Toppersnotes®
Unleash the topper in you

# MPSC

## राज्यसेवा पूर्व एवं मुख्य परीक्षा

## महाराष्ट्र लोक सेवा आयोग

## सामान्य अध्ययन

पेपर 3

# मानव संसाधन विभाग

SIERRA INNOVATIONS

# Maharastra - PSC


| क्र.सं. | अध्याय | पृष्ठ सं. |
|---|---|---|
| | **मानव संसाधन विभाग एवं मानवी हक्क** | |
| 1. | मानव संसाधन विभाग | |
| | • भारतातील मानव संसाधन विकास | 1 |
| | • शिक्षण | 60 |
| | • व्यावसायिक शिक्षण | 81 |
| | • आरोग्य | 91 |
| | • ग्रामीण विकास | 108 |
| 2. | मानवी हक्क | |
| | • नागरिक मानवी हक्क प्रतिज्ञापत्र | 128 |
| | • बाल विकास | 138 |
| | • युवक विकास | 143 |
| | • सामाजिकदृष्ट्या शोषित वर्गाचा विकास | 151 |
| | • महिला विकास | 159 |
| | • आदिवासी चळवळ | 171 |
| | • वयोवृध्द लोकांचे कल्याण | 181 |
| | • कामगार कल्याण | 190 |
| | • विकलांग व्यक्तींचे कल्याण | 196 |
| | • लोकांचे पुनर्वसन | 199 |
| | • आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटना | 203 |
| | • ग्राहक संरक्षण | 207 |
| | • मूल्ये व नीतितत्वे | 212 |

# मानव संसाधन विभाग

## भारतातील मानव संसाधन विकास

मानवी संसाधन हे देशांतर्गत वस्तु व सेवांच्या एकुण उत्पादनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यामध्ये होणारी वाढ व दोन्हीमध्ये आढळणारा फरक अधिक योग्यपणे समजून घेण्याकरीता लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा व निर्देशकांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. मानवी संसाधनाच्या आर्थिक विकास व वाढीशी दोन प्रकाराचा संबंध असतो. पहिले म्हणजे देशाची लोकसंख्या ही उत्पादनाचा प्रमुख घटक म्हणुन कार्य करते. उत्पादनाचे इतर घटक असे, जमीन, भांडवल इ. लोकसंख्येच्या गुणवत्तेवर अवलंबुन असतो. दुसरे म्हणजे ग्राहक म्हणुन देशांतर्गत निर्माण होणाऱ्या राष्ट्रीय उत्पादनाला 'मागणी' तयार करणारा घटक देखील लोकसंख्याच असते. म्हणुनच लोकसंख्येचा आकार हा आर्थिक विकासाच्या प्रमुख निर्धारक घटक होय. परंतु फक्त आकाराने मोठी लोकसंख्या असणे हे विकासासाठी पुरेसे ठरत नाही. म्हणजे केवळ आकाराने वाढणाऱ्या लोकसंख्येला अतिरिक्त लोकसंख्या म्हणतात. शब्दाच्या खऱ्या अर्थाने विकास साधण्यासाठी लोकसंख्येचे रूपांतर संसाधनामध्ये होणे गरजेचे असते. म्हणजेच तिची गुणवत्ता वाढणे गरजेचे असते.

- लोकसंख्या म्हणजे काय?

"एखादया विशिष्ट प्रदेशातील किंवा देशातील एका विशिष्ट सौर वर्षाच्या कालावधीत लोकांची केलेली गणना म्हणजे ती त्या देशांची लोकसंख्या होय." लोकसंख्या व संसाधन या संबंधी विचार सर्वप्रथम प्लेटो याने मांडले. परंतु या विषयाची सविस्तर मांडणी ही सर थॉमस रॉबर्ट माल्थस यांनी केली.

Toppersnotes
Unleash the topper in you

म्हणुन माल्थस यांना लोकसंख्या शास्त्राचा जनक ही म्हटले जाते. माल्थस यांच्या सिध्दांतानंतर अनेक विचारकांनी लोकसंख्या नियंत्रण करण्याच्या अनेक नियमांचे प्रतिपादन केले. यातुन लोकसंख्या + वाढ, वाढीची कारणे, आणि नियंत्रण या संबंधी दोन विचार (सिध्दांत) समोर आहे.

लोकसंख्या सिध्दांत

- लोकसंख्या नियंत्रणाच्या नैसर्गिक सिध्दांत
  या सिध्दांताचा जनक थॉमस रॉबर्ट माल्थस समर्थक - थॉमस सॅडलर, थॉमस डब्ल्यु, हर्बर्ट स्पेन्सर
- लोकसंख्या नियंत्रणाच्या सामाजिक सिध्दांत
  हेन्री जॉर्ज, असॅन ड्युमॅट, डेव्हीड रिकार्डो, कार्ल मार्क्स

• माल्थसच्या नैसर्गिक सिध्दांत

इंग्लंडच्या निराशावादी अर्थतज्ज्ञ थॉमस माल्थस याने इ.स. 1798 प्रकाशित निबंध An Esay on the Principles of Population यामध्ये त्याने लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्य वाढ या मधील सहसंबंधाविषयी मत मांडले. त्याच्या मते कोणत्याही क्षेत्रामध्ये लोकसंख्या वाढ ही गुणाकार पध्दतीने वाढते म्हणजे लोकसंख्या ही 2, 4, 8, 16, 32, 64 या प्रमाणे वाढते तर संसाधने ही गणितीय म्हणजे 1, 2, 3, 4, 5, 6 या पध्दतीने याचा परिणाम भविष्यात संसाधने अपुरी पडतील. यामुळे उदरनिर्वाहाच्या संसाधनामध्ये अडचणी निर्माण होतील.

Toppersnotes
Unleash the topper in you

त्याचप्रमाणे लोकसंख्यावाढीचा दर असाच राहिला तर प्रत्येक 25 वर्षानंतर लोकसंख्या दुप्पट होईल. आणि ही वाढ अशीच राहिल तर 200 वर्षात लोकसंख्या 256 पट होईल. आणि अशा स्थितीत अन्नधान्यात फक्त 9 पट वाढ होईल, ज्याचा परिणाम अन्नधान्याची प्रचंड समस्या निर्माण होऊन भुकबळी नैसर्गिक प्रकोप, संक्रमक रोग, युध्द होऊन अकाली मृत्यु होतील व लोकसंख्या नैसर्गिकरित्या संतुलित होईल. या आधीच नैतिक नियंत्रण आवश्यक.

● लोकसंख्या सामाजिक सिध्दांत

लोकसंख्या जैविक किंवा नैसर्गिक सिध्दांताच्या विपरीत मार्क्सने साम्यवादी सिध्दांताच्या आधार लोकसंख्या सिध्दांत मांडला मार्क्सच्या मते,

"जगातील समाज हा दोन वर्गात विभागला गेला आहे - गरिब आणि दुसरा श्रीमंत. यातील श्रीमंत हा उत्पादन साधनांच्या मालक आहे. त्यामुळे तो संपत्ती संग्रहावर भर देतो. परिणामी गरिब समुह हा श्रमसंग्रहाणावर भर देऊन संपत्ती संग्रह करण्याचा प्रयत्न करतो. यामुळे लोकसंख्या तीव्र गतीने वाढते कारण श्रम हीच एकमेव संपत्ती गरीब समुहाची असते. यामुळे श्रीमंत समुह हा गरीबांच्या अतिरिक्त समुहाला लोकसंख्येला स्वस्त म्हणुन मजुर या नावाने बघतो. यातुनच मार्क्सने गरिबी, बेरोजगारी आणि लोकसंख्या वाढ यांचा सहसंबंध लावला आहे. म्हणुन तर गरिब हा श्रीमंत नसुन गरिब या नावाने ओळखला जातो. पण गरिबांची खरी संपत्ती ही मजुरी आहे. मजुरी केल्याशिवाय गरिब हा श्रीमंत बनु शकत नाही.

Toppersnotes
Unleash the topper in you

• लोकसंख्या मोजण्याचा इतिहास

कोणत्याही देशासाठी लोकसंख्येची माहिती त्या देशातील शेती, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य, रोजगार इत्यादींच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असते. या उद्देशानेच जगात वेगवेगळ्या ठिकाणी लोकसंख्या मोजण्यास सुरुवात झाली, विशेषत: इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या देशात.

| विचारवंत | देश | साल (कालावधी) | आधार | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|
| जॉन ग्रांट | इंग्लंड | 1620-1764 | स्मशानभूमी हॉस्पिटल | जन्मप्रमाण मृत्यू प्रमाण, लिंग गुणोत्तर स्थलांतरण या आधारे मोजमापन |
| ग्रेगरी | इंग्लंड | 1656-1742 | लंडन शहरातील लोकसंख्या | लोकसंख्येवर परिणाम करणारे घटक, भौगोलिक, राजकीय व जीवशास्त्रीय |
| रॉबर्ट माल्थस | इटली (इंग्लंड) | 1798 | इंग्लंडमधील वाढती लोकसंख्या | लोकसंख्या वाढ, मागणी पुरवठा नैसर्गिक सिद्धांत |
| | जर्मनी | 1760 | जर्मनी, फ्रान्स व स्वीडनची लोकसंख्या | जन्म, मृत्यू, वंशवृद्धी विवाहाचे वय, रोगांचा फैलाव |
| डॅनीयल वरनॉली | फ्रान्स | 1760 | फ्रान्स, लोकसंख्या | आयुर्मान, वयसारणी |

Toppersnotes
Unleash the topper in you

याप्रमाणे जगातील लोकसंख्येत भारताची स्थिती माहिती करून घेतल्यानंतर भारताच्या लोकसंख्येच्या पुढील बाबींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

१) लोकसंख्येचा आकार
२) लोकसंख्या वाढीचा दर
3) 1901 ते 2011 या काळातील लोकसंख्या वाढ
४) लोकसंख्या वाढीचे टप्पे

| | | | |
|---|---|---|---|
| अ | प्रथम टप्पा | 1901 - 1921 | स्थिर लोकसंख्यावाढीचा काळ |
| ब | द्वितीय टप्पा | 1921 - 1951 | मंदवाढीचा काळ |
| क | तृतीय टप्पा | 1951 - 1981 | वेगवान वाढीचा काळ |
| ड | चतुर्थ टप्पा | 1981 - 2011 | उच्च वाढ मात्र वाढीचा दर घसरता |

५) लोकसंख्येचे राज्यनिहाय वितरण
६) लोकसंख्या घनता / राज्यनिहाय वितरण
७) जन्मदर जन्मदराची कारणे - सामाजिक, आर्थिक
८) जन्मदराचा परिणाम
९) मृत्युदर
१०) स्त्री पुरुष लिंग गुणोत्तर
११) भारतातील वय संरचना
१२) लोकसंख्यांकीय लाभांश
१३) भारतीय नागरी लोकसंख्या
१४) ग्रामीण झोपडपट्टी लोकसंख्या

Toppersnotes
Unleash the topper in you

# लोकसंख्येची घनता

"ज्या शहराची लोकसंख्या फार मोठी असेल, त्या शहरांचे 'योग्य प्रशासन' ही अशक्य गोष्ट असते. राज्यांच्या आकारामध्ये वाढ होण्यास मर्यादा असतात. अशाच प्रकारच्या मर्यादा वनस्पती, प्राणी व इतर सजीवानाही असतात व निसर्गाचा हा नियमच आहे" की, अस्तित्व टिकून राहण्यासाठी एकूण संख्या ही फार कमी किंवा अतिशय जास्त असता कामा नये. ॲरिस्टॉटल प्रति चौरस किलोमीटर भू-प्रदेशावर किती लोक वास्तव्यास आहेत हे दर्शविणारी संकल्पना म्हणजे 'लोकसंख्येची घनता' ही जमीन/भूप्रदेश व लोकसंख्या ह्यांचा परस्परसंबंध दर्शविते. म्हणजेच लोकसंख्या घनता या संकल्पनेच्या आधारे एखादा भूप्रदेश अधिकाधिक किती लोकसंख्येच्या मुलभूत गरजा पूर्ण करू शकतो या क्षमतेची कल्पना करता येते. 2011-च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या घनता 382 प्रति चौ.किमी एवढी होती. 2001-2011 या दशकामध्ये प्रति चौ.किमी भूप्रदेशावर 58 लोकांची अधिक भर पडलेली आहे. जागतिक स्तरावर विचार करता बांग्लादेश नंतर भारतामध्ये लोकसंख्येची घनता सर्वात जास्त आहे. भारत जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी फक्त 2.4% एवढे क्षेत्रफळ व्यापतो. मात्र एकूण जागतिक लोकसंख्येच्या 17.5% वाटा भारताचा आहे. याचवेळी हेच प्रमाण अमेरिकेमध्ये (USA) 7.2% व 4.5% एवढे आहे. भौगोलिक वैशिष्ट्ये, हवामानातील बदल, सामाजिक व राजकीय घटकांच्या विभिन्न प्रभावामुळे लोकसंख्येच्या घनतेचे वितरण अतिशय विषम प्रकारचे बनलेले आहे.

Toppersnotes
Unleash the topper in you

• जन्मदर :- एखादया व्यक्तीची किंवा गटाची प्रत्यक्षातील प्रजनन क्षमता म्हणजेच जन्मदर होय. जन्मदराचे मोजमाप करण्यासाठी 'अशोधित जन्मदर' हा निर्देशांक महत्त्वाचा ठरतो. अशोधित जन्मदर मोजण्यासाठी पुढील सूत्राचा वापर करतात. एकुण लोकसंख्या वाढीमध्ये जनन-दराचे योगदान किती आहे हे अशोधित जन्मदराच्या साहाय्याने स्पष्टपणे मोजता येते. परंतु निर्देशांकामध्ये काही उणिवा जाणवतात. जसे असा जन्मदर मोजताना पुरुष व लहान मुली आणि वृद्ध स्त्रिया यांचादेखील समावेश होतो, जे की प्रजननक्षम नसतात.

$$\text{साधारण जन्मदर} = \frac{\text{विशिष्ट भुप्रदेशातील एका वर्षात जिवंत जन्मास आलेली अपत्ये}}{\text{त्या वर्षाच्या मध्यबिंदुवर असलेली 15 ते 49 वयोगटातील स्त्रियांची एकुण लोकसंख्या}} \times 1000$$

$$\text{वयाच्या विशिष्ट जन्मदर} = \frac{\text{जन्म दिलेल्या आपत्यांची संख्या}}{\text{त्या वर्षाच्या मध्यबिंदुवर असलेली त्या वयोगटातील एकुण स्त्रियांची संख्या.}} \times 1000$$

• उच्च जन्मदराची कारणे

1) सामाजिक कारणे

• विवाहाचे वय
• मुलाचा अट्टाहास
• संयुक्त कुटुंब पद्धती
• शिक्षणाचे अल्प प्रमाण
• अर्भक मृत्यु व बालमृत्यु प्रमाण जास्त.

Toppersnotes
Unleash the topper in you

२) आर्थिक कारणे :-
• दारिद्र्य
• कृषीक्षेत्रात रोजगार निर्मितीतील प्राबल्य
• आर्थिक परावलंब

• मृत्युदर
१) अशोधित मृत्युदर
२) वयाच्या विशिष्ट मृत्युदर
३) अर्भक मृत्युदर

अशोधित मृत्युदर हा सामान्यपणे एकुण मृत्युदर दर्शविण्या-साठी वापरला जातो.

$$\text{अशोधित मृत्युदर} = \frac{\text{विशिष्ट भुप्रदेशात एका वर्षात नोंदीत मृत्युंची एकुण संख्या}}{\text{त्या वर्षाच्या मध्यबिंदूवर असले-ली एकुण लोकसंख्या}} \times 1000$$

अशोधित जन्मदराप्रमाणेच अशोधित मृत्युदरामध्ये काही दोष आढळून येतात असे असा दर काढताना लोकसंख्येच्या वयोरचनेमधील विविध गटांची मर्त्यता एकत्रित्या लक्षात घेतली जातात. उदा. एखादया देशाच्या लोकसंख्येमध्ये वृद्ध लोक प्रमाण अधिक असेल व त्याच्याउलट दुसऱ्या देशाच्या लोकसंख्येमध्ये वृद्ध लोकांचे प्रमाण कमी असले तरी दोन्ही देशांचे अशोधित मृत्युदर हे समान येऊ शकतात. वयाच्या विशिष्ट मृत्युदरामध्ये त्या-त्या विशिष्ट वयोगटातील व्यक्तींचाच विचार केला जातो, त्यामुळे अशोधित मृत्युदराचे दोन प्रकारच्या निर्देशांकामध्ये आढळत नाही. परंतु प्रत्यक्षामध्ये दोन्ही देशामधील मृत्युदराची परिस्थिती भिन्न असू शकते. या अशोधित जन्मदराप्रमाणेच अशोधित मृत्यु-दरामध्ये काही दोष आढळून येतात.

$$\text{वयाच्या विशिष्ट मृत्युदर} = \frac{\text{विशिष्ट भूप्रदेशातील विशिष्ट वयोगटातील एका वर्षाच्या कालावधीत नोंदीत मृत्यूची एकुण संख्या}}{\text{या वर्षाच्या मध्यबिंदूवर असलेली त्या वयोगटाची लोकसंख्या}} \times 1000$$

लोकसंख्याशास्त्रानुसार ज्या मुलांनी स्वत:चे एक वर्ष केलेले नाही, अशा सर्व मुलांना 'अर्भक' म्हटले जाते. अर्भक या वयोगटातील मत्यंलेच्या विशेष अभ्यास केला जातो कारण या वयोगटातील मर्त्यतेचे प्रमाण हे सर्वाधिक असते. विशेषत: विकसनशील व मागास राष्ट्रांमध्ये याचे प्रमाण उच्च असते. यामुळे देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासाचा व जीवनस्तराची पातळी व दर्जा यांचे एक प्रमाणक म्हणुन या अर्भक मृत्युदराचा आधार घेतला जातो.

$$\text{अर्भक मृत्युदर} = \frac{\text{विशिष्ट भूप्रदेशात एका वर्षात नोंदीत एकुण अर्भक मृत्यूची एकुण संख्या}}{\text{त्या वर्षामध्ये एकुण जन्मास आलेल्या जिवंत अपत्यांची संख्या}} \times 1000$$

एकंदरीत भारताच्या लोकसंख्यावाढीचे अध्ययन केले तर या वाढीचे प्रमुख कारण हे मृत्युदरामध्ये 1951 नंतर झपाट्याने झालेली घट दिसुन येते. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर विविध उपाययोजनामुळे मृत्युदर घट झाली. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

- मृत्युदर घटण्याची कारणे

1) विविध साथीच्या आजावर मिळावलेले नियंत्रण

2) अन्नसुरक्षा

3) सार्वजनिक आरोग्य सुविधात झालेली वाढ

4) प्रचंड लोकसंख्यावाढ

## ● स्त्री - पुरुष लिंग गुणोत्तर

लिंग संरचना ही लोकसंख्येतील तोल दर्शविते. म्हणजेच लोकसंख्येतील स्त्री - पुरुषांचे सापेक्ष प्रमाण याला लिंग संरचना म्हणतात. लोकसंख्येतील स्त्री-पुरुषाचे प्रमाण 1000 किंवा 100 पुरुषाबरोबर किती स्त्रिया या पद्धतीने काढले. हे प्रमाण काढण्यासाठी पुढील सुत्र वापरले जाते.

$$\text{स्त्री पुरुष (लिंगप्रमाण)} = \frac{\text{एखादया देशातील / प्रदेशातील स्त्रियांची संख्या}}{\text{त्या देशातील / प्रदेशातील पुरुषांची संख्या}} \times 1000$$

समजा = एखादया देशातील लोकसंख्येत स्त्रियांची संख्या 40 कोटी आणि पुरुषांची संख्या 50 कोटी

तर $\frac{40}{50} \times 1000 = 800$ स्त्री

## ● लोकसांख्यिकी लाभांश :-

लोकसांख्यिकी लाभांश ही संकल्पना समजुन घेण्यासाठी त्या अगोदर लोकसंख्या संक्रमण ही प्रक्रिया समजावुन घ्यावी लागेल. एकूण लोकसंख्येच्या संरचनेमध्ये कालांतराने होत जाणारा बदल म्हणजे लोकसंख्या संक्रमण होय. एका ऐतिहासिक कालखंडामध्ये जन्म व मृत्यु दरामध्ये उच्च स्तरावरून निम्नस्तराकडे होणारी बदल्या स्वरूपातील वाटचाल म्हणजेच लोकसंख्या संक्रमण होय. लोकसंख्या संक्रमणाच्या प्रक्रियेमुळे कोणत्याही देशात तीन विशिष्ट प्रकारचे वय संरचनात्मक टप्पे निर्माण होतात. हे टप्पे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

1) प्रथम टप्प्यामध्ये जनन दर व मृत्युदर दोन्ही उच्चतम स्तरावर असतात. परिणामी एकुण लोकसंख्येमध्ये प्रामुख्याने 15 वर्षे वयाखालील तरुण व मुलांची लोकसंख्या सर्वात जास्त असते.

२) द्वितीय टप्प्यामध्ये जनन दर व मृत्युदर दोन्ही उच्च-तम स्तरावर असतात. जनन दर वेगाने घटण्यास सुरुवात होते व त्यामुळे 15 वर्षे वयाखालील लोकसंख्येमध्ये (मुले) देखील घट होत जाते. परंतु गतकाळामध्ये वाढ होत जाते. अवलंबित्वाचे प्रमाण देखील यामुळे कमी होते.

३) तृतीय टप्प्यामध्ये जननदर व मृत्युदर अतिशय कमी होतात. जननदराचे प्रमाण अतिशय कमी झाल्यामुळे लोकसंख्येत नवीन भर अल्प असते. कार्यकारी लोकसंख्या आता वृद्धत्वाकडे झुकू लागते. मृत्युदर कमी असल्याने आयुर्मानामध्ये वाढ होते परिणामी एकूण लोकसंख्येमध्ये वृद्धांचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढते व पुन्हा 'अवलंबित्वाचे प्रमाण वाढते.

'लोकसंख्येतील वाढत्या कार्यकारी लोकसंख्येमुळे एकूण आर्थिक विकासामध्ये घडून येणारी वाढ म्हणजेच लोकसांख्यिकी लाभांश होय.' यालाच लोकसांख्यिकी भेट, किंवा बोनस किंवा लोकसांख्यिकी खिडकी असेही म्हणतात. लोकसांख्यिकी लाभांशाची स्थिती अल्पकालीन असते. मात्र भारतामध्ये लोकसंख्या संक्रमणाचा वेग हा विविध राज्यांनुसार भिन्न भिन्न असल्याने लाभांशाची स्थिती दीर्घकाळापर्यंत टिकून राहू शकते.

● लाभांशाचे फायदे

१) या काळादरम्यान एकूण 'बचतीचा दर' वाढला जातो. अवलंबित्व लोकसंख्येचे प्रमाण कमी झाल्याने व आयुर्मानामध्ये वाढ झाल्याने बचतीचा दर वाढतो. महत्त्वाचे म्हणजे प्रौढ लोकसंख्या वाढली म्हणून नाही तर लहान मुलांची अवलंबित लोकसंख्या कमी झाल्याने बचत दर वाढतो.

२) मानवी संसाधनाचा प्रमुख भाग म्हणजे स्त्रिया होत. या

टप्प्यामध्ये जननदर कमी झाल्याने व आयुर्मानामध्ये वारंवार प्रसुती काळ्य उद्भवतात नाही. परिणामी स्त्रियांना घराबाहेर पडून आर्थिक क्रियांमध्ये सहभाग घेता येतो, ज्यामुळे आर्थिक विकासाला मोठी चालना मिळते.

३) लहान मुलांची संख्या कमी असल्याने प्रौढ व्यक्ती स्वतः च्या आरोग्याकडे जास्त लक्ष पुरवू शकतात. त्यामुळे कार्यक्षमता वाढून आर्थिक उत्पादनामध्ये वाढ होते.

४) शासनाला देखील उत्पादक लोकसंख्येवर अधिक लक्ष केंद्रीत करता येते. या मानवी संसाधनाच्या विकासासाठी प्रयत्न करून राष्ट्राच्या विकासाची व सुरक्षिततेची जबाबदारी कमी होते.

- लोकसंख्या संक्रमण व वृद्धांचे वाढते प्रमाण

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे लोकसंख्या संक्रमणामुळे देशाला असा लोकसांख्यिकी लाभांशाचा फायदा होतो. अगदी तसेच कालांतराने नवीन आव्हानांना देखील सामोरे जावे लागते. या अनेक आव्हानांपैकी लोकसंख्येतील वृद्धांचे वाढते प्रमाण हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. वृद्धांची वाढती लोकसंख्या, त्यांच्या विविध समस्या व त्यांचे मानवी संसाधनाच्या दृष्टिकोनातून करावे लागणारे व्यवस्थापन या बाबींचा समावेश यामध्ये होतो. भारतामध्ये 1947 साली 1 कोटी 90 लाख वृद्ध लोकसंख्या होती. 2001 च्या जनगणनेनुसार ही लोकसंख्या वाढून 7 कोटी 60 लाख एवढी झाली. जगामध्ये चीननंतर सर्वात जास्त वृद्धांची लोकसंख्या भारतामध्ये आहे. डेव्हिड ई. ब्लुम यांच्या अंदाजानुसार भारतामधील वृद्ध ही लोकसंख्या येत्या चार दशकांमध्ये 31 कोटी 60 लाखांवर पोहचण्याची शक्यता आहे व चीनला भारत 2030 पर्यंत मागे टाकून प्रथम क्रमांक प्राप्त करेल.

Toppersnotes
Unleash the topper in you

● ग्रामीण व नागरी लोकसंख्या

'नागरीकरण' प्रामुख्याने औद्योगिक क्रांतीचा परिणाम होय. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे कृषक समाजाच्या आर्थिक, सामाजिक व भौतिक पर्यावरणामध्ये परिवर्तन होऊन नागरीकरणाला सुरूवात झाली. त्यामुळे ग्रामीण व शहरी असे दोन विभिन्न गट निर्माण झाले.

● संकल्पना :- नागरी भागाची सर्वमान्य अशी व्याख्या अस्तित्वात नाही. विविध देशांमध्ये स्थानिक सामाजिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थितीनुसार विभिन्न व्याख्या निश्चित केल्या गेल्या आहेत. भारतामध्ये जनगणनेच्या आरंभापासून 'नगर' ही संकल्पना अस्तित्वात आली. त्यानुसार कोणत्याही आकाराची नगरपालिका, प्रत्येक कॅन्टोनमेंट बोर्ड, नगरपालिका कक्षेबाहेरील सर्व सिव्हिल लाईन्स आणि अशी सर्व ठिकाणे जिथे नगरपालिका प्रशासन अस्तित्वात नसेल परंतु तेथे 5000 पेक्षा जास्त व्यक्ती कायमस्वरूपी वास्तव्यास आहेत, तर त्यांच्या घरांच्या समुदायाला 'नगर' मानले जावे. या व्याख्येनुसार 1961 पर्यंत जनगणना करण्यात आली. परंतु 1961 सालच्या जनगणेदरम्यान या व्याख्येमध्ये बदल करण्यात आला. त्यानुसार 'नागरी भागाच्या' निश्चितीसाठी दोन निकष ठरविण्यात आले ते, पुढीलप्रमाणे :-

1) वैधानिक प्रशासन - त्या ठिकाणाच्या प्रशासनाचा स्तर

2) लोकसांख्यिकी व आर्थिक स्थिती - एकुण लोकसंख्येचा आकार, घनता इ. तसेच बिगर कृषी व्यवसायात गुंतलेल्या एकुण लोकांचे प्रमाण.

या वरील दोन निकषांवर आधारून ठिकाणांना 'नागरी दर्जा' देण्याचे निश्चित करण्यात आले. पहिल्या निकषांनुसार निर्धारित नगरांना 'वैधानिक नगरे' असे म्हणतात.

१) वैधानिक प्रशासन :- नगरपालिका, महानगरपालिका, कॅन्टोनमेंट बोर्ड व सर्व अधिसूचित प्रादेशिक समित्या असलेली सर्व ठिकाणे इ.

२) लोकसांख्यिकी व आर्थिक स्थिती

१) कमीत कमी 5000 लोकवस्ती

२) कमीत कमी एकुण लोकसंख्येपैकी 75% लोक हे बिगर कृषी व्यवसायामध्ये कार्यरत असावेत.

३) प्रति चौकिमी किमान 400 व्यक्ती इतकी लोकसंख्या घनता असावी.

याशिवाय, त्या राज्यातील / केंद्रशासित प्रदेशामधील 'जनगणना संचालक' एखाद्या वैशिष्ट्यपुर्ण ठिकाणाला, जरी ते वरील दोन्ही निकषांना पुर्ण करीत नसेल, तरी सुद्धा त्याला नगराचा दर्जा देऊ शकतात. असा दर्जा देताना जनगणना संचालक हे त्या राज्यातील राज्यशासन किंवा केंद्रशासित प्रदेशातील प्रशासक आणि भारताचे जनगणना आयुक्त यांच्याशी सल्ला मसलत करतात.

नागरी लोकसंख्येसंदर्भामध्ये आणखी एक मुद्दा महत्त्वाचा आहे. नागरी भागामध्ये वास्तव्यास असणाऱ्या लोकसंख्ये व्यतिरिक्त काही लोक रेल्वे कॉलनी, विद्यापीठाच्या परिसर, निवासी ठिकाणे, इ. ठिकाणी वास्तव्यास असतात व जी प्रशासकीय कक्षेबाहेर असतात. अशा परिसराला जनगणना परिभाषेत 'बाह्यविकास' म्हणतात. असे 'बाह्य विकसित ठिकाणे व मुख्य नगर यांना मिळून नागरी संकुल म्हणतात. भारतामध्ये 1971 च्या जनगणनेनुसार ही संकल्पना वापरात आणली गेली.

• नगरांची वाढ :-

भारतीय जनगणनेनुसार नागरी भागांचे एकुण सहा वर्गामध्ये विभाजन केले आले. ते पुढीलप्रमाणे सांगण्यात आले आहे.

Toppersnotes
Unleash the topper in you

| लोकसंख्या | वर्ग | लोकसंख्या | वर्ग |
|---|---|---|---|
| 1,00,000 आणि जास्त | 1 | 10,000 - 19,999 | 4 |
| 50,000-99,999 | 2 | 5000 - 9,999 | 5 |
| 20,000-49,499 | 3 | 5000 पेक्षा कमी | 6 |

● झोपडपट्टी व नागरी लोकसंख्या

झोपडपट्टी ही नागरीकरणाच्या नकारात्मक परिणाम होय. 2001 च्या जनगणेनुसार 42.6 दशलक्ष लोकसंख्या नागरी झोपड्यामध्ये निवास करते. हे प्रमाण एकुण नागरी लोकसंख्या 15% होते. 2001 च्या जनगणनेनुसार झोपडपट्ट्या असलेल्या नागरी वसाहतींचे प्रमाण सर्वात जास्त आंध्रप्रदेश (77) व त्यानंतर उत्तर प्रदेश (69), तमिळनाडू (63) व महाराष्ट्र (61) होते, देशाच्या एकूण झोपडपट्ट्यामध्ये राहणाऱ्या लोकसंख्येपैकी जवळपास 50% लोकसंख्या फक्त तीन राज्यामध्ये एकवटलेली होती: महाराष्ट्र (26.3%) आंध्रप्रदेश (12.2%) व उत्तरप्रदेश (10.3%). परंतु एकुण नागरी लोकसंख्येशी झोपडपट्टीतील लोकसंख्येचे प्रमाण सर्वात जास्त असलेले राज्य मेघालय (65%) होते. देशातील सर्वात जास्त झोपडपट्टीतील लोकसंख्येचे प्रमाव हे सर्वत्र समान स्वरूपाचे नाही. हिमाचल प्रदेश (89.96%) लोकसंख्येचे प्रमाण बृहन्मुंबई (6.5 दशलक्ष) त्यानंतर दिल्ली (1.9 दशलक्ष) व कोलकता (1.5 दशलक्ष) येथे होते.